संक्षिप्त फौजदारी खटला क्र.५६२/२०१५
निशाणी क्र. १४ च्या पुढे

MHTH110000312015

## न्यायनिर्णय

(आज दिनांक ०८ मे २०२६ रोजी पारीत)

१) प्रस्तुतचे दोषारोपपत्र आरोपी विरूध्द मुंबई पोलीस कायदा कलम १२४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हयासाठी दाखल करण्यात आला आहे. दोषारोप (Particulars of offence) निश्चित केले असता त्याने लावलेले आरोप नाकारले आणि खटल्याच्या संपरिक्षणास सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

२) प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्षाचे दोन साक्षीदार तपासले असून त्याबाबतचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराची वर्गवारी |
|---|---|---|
| १ | राजु अण्णा भोसले | फिर्यादी |
| २ | राजाराम जोतीराम जगताप | साक्षीदार |
| ३ | सुनिल देवराम सोनावले | तपासी अधिकारी |

| कागदपत्रांचे वर्णन | निशाणी क्र. |
|---|---|
| पंचनामा | १६ |
| पत्र | २१ |

३) दिनांक ०७/०१/२०२१ रोजी हया न्यायालयाच्या पुर्व पिठासीन अधिका—यांनी निशाणी क्र.१४ वर आरोपीवर मुंबई पोलीस कायदा कलम १२४ अन्वये दोषारोप ठेवले. आरोपीने गुन्हा कबुल केला नाही म्हणुन आरोपी विरुध्द प्रस्तुत खटला पुढे चालविण्यात आला. आरोपीविरुध्द गुन्हयात गोवणारा पुरावा अभिलेखावर आला असल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे त्यांचे निवेदन

नोंदविण्यात आले.

**विचाराधीन मुददे :**

**४)** विशेष सहाय्यक अभियोक्ता श्री. सी. व्ही. बारस्कर आणि आरोपीचे विधीज्ञ श्री.बी.एस.मेंढे यांचे युक्तीवाद ऐकले. अभियोग पक्षाची हकिकत पटलावरील पुरावा आणि युक्तीवाद ऐकता प्रस्तुतचा खटला निकाली काढण्याकरिता माझेसमोर खालील मुददे उपस्थित होतात, व त्यावरील निष्कर्ष आणि आवश्यक कारणे मी तदंतर विस्तृत करतो.

| क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २५/११/२०१४ रोजी ११.०० वा. च्या सुमारास आरोपीच्या ताब्यात सॅमसंग कंपनीचा पांढ—या रंगाचा मोबाईल मिळून आला व सदरचा माल त्याने गैरमार्गाने मिळवून ताब्यात बाळगला व याबाबत काहीही स्पष्टीकरण केले नाही. ही बाब अभियोग पक्ष सिध्द करतो का? | नाही |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**कारणमिमांसा**

**मुददा क्र.१ करीता :**

**५)** आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने वर नमुद तक्यातील साक्षीदारांना अनुक्रमे निशाणी क्र.१४ अ वर तपासले.

**६)** साक्षीदार क्र.१ राजू आण्णा भोसले हे त्यांच्या पुराव्यात सांगतात की, दिनांक २५/११/२०२४ रोजी त्यांची नेमणूक कल्याण रेल्वे पोलीस स्टेशन येथे गुन्हे शोध पथकात होती. त्यावेळी त्यांच्याबरोबर पोलीस कॉन्स्टेबल धायगुडे होते. त्यादिवशी ते कल्याण रेल्वे स्टेशन फलाट क्र. १ वर गस्त घालत असताना त्यांना फलाटावर गर्दीत त्यांना आरोपी संशयास्पदरित्या दिसून आल्याने त्यांनी त्याला कल्याण रेल्वे लोहमार्ग पोलीस ठाणे येथे आणले. तेथे ठाणे अंमलदार यांचे समक्ष दोन पंचासह त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे त्यांना एक पांढ—या रंगाचा सॅमसंग कंपनीचा मोबाईल मिळून आला. त्या मोबाईलबाबत त्याला विचारपुस केली असता

त्याने समाधानकारक उत्तर दिले नाही. त्यामुळे त्याला अटक पंचनाम्याने अटक केली.

**७)** साक्षीदार क्र.२ राजाराम जोतीराम जगताप हे त्यांच्या पुराव्यात सांगतात की, दिनांक २५/११/२०१४ रोजी त्यांची ठाणे अंमलदार म्हणून कल्याण रेल्वे पोलीस स्थानक येथे कार्यरत होती. त्यादिवशी अकरा वजण्याच्या सुमारासा पोलीस कर्मचारी भोसले हे त्यांच्याकडे एक इसम घेवून आले. त्यांनी एका पोलिस शिपायास पंनाचा बोलविण्यास सांगितले व आरोपीची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्याच्याकडून एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल मिळून आला.

**८)** साक्षीदार क्र.३ सुनील देवराम सोनावले हे त्यांच्या पुराव्यात सांगतात की, सन २०१४ मध्ये ते कल्याण लोहमार्ग पोलीस ठाण्यात पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत होते. दिनांक २५/११/२०१४ रोजी ते कर्तव्यावर असताना पोलीस शिपाई भोसले हयांनी संशयावरुन आरोपी सचीन जाधव हयास मुंबई पोलीस कायदा कलम १२४ अन्वये ताब्यात घेतले होते. सदर आरोपीची त्यांनी दोन पंचासमक्ष अंगझडती घेतली होती. त्यावेळी त्यांना त्याच्याकडे रु.१६,०००/— किंमतीचा पांढ—या रंगाचा सॅमसंग मोबाईल फोन मिळून आला. सदरचा मोबाईल फोन सहा. पोलीस निरीक्षक जगताप हयांनी मुददेमाल कारकुनाकडे जमा केला. त्यानंतर गुन्हयाचा तपास त्यांच्याकडे देण्यात आला. त्यांनी प्रथम न्यायालयाकडे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५५ २ अन्वये गुन्हयाच्या तपासासाठी परवानगी अर्ज सादर केला. मोबाईल मालकाचा तपास केला मात्र मालक मिळून आला नाही. तसेच त्यांनी तपासादरम्यान विविध लोहमार्ग पोलीस ठाण्यांना मोबाईल अनुषंगाने गुन्हा दाखल आहे का हयाबाबत पत्र दिले होते.

**९)** अभियोग पक्षाने प्रस्तुतचा खटला आरोपीविरुध्द मुंबई पोलीस कायदा कलम १२४ अन्वये दाखल केलेला आहे. खटल्याचे स्वरुप पाहता अभियोग पक्ष गुन्हयातील मुददेमाल हा आरोपीने गैरमार्गाने मिळवून ताब्यात बाळगला होता व त्याबाबत त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने त्याचे योग्य ते स्पष्टीकरण दिले नाही याबाबी अभियोग पक्ष सिध्द करतो काय हे पाहणे गरजेचे आहे.

१०) त्याअनुषंगाने पटलावर आलेला पुरावा पाहता आरोपीने गुन्हयातील जप्त मुददेमाल हा त्याच्या ताब्यातून जप्त केल्याची बाब स्पष्टपणे नाकारलेली आहे. अशा परिस्थतीत सदरचा मुददेमाल हा आरोपीच्या ताब्यातून जप्त करण्यात आलेला होता ही बाब अभियोग पक्षाच्या साक्षीपुराव्यातून संशयापलीकडे जावून सिध्द होती किंवा कसे याबाबत पटलावर आलेला पुरावा पाहता साक्षीदार क्र. २ ठाणे अंमलदार राजाराम पाटील हे त्याच्या साक्षीपुराव्यात साक्षीदार क्र. १ पोलिस कर्मचारी भोसले हे त्याच्याकडे एका इसमास घेउन आले होते. त्यांनी एक पोलिस शिपायांस पंचांना बोलविण्यास सांगितले व सदरहू पंचासमक्ष त्यांनी त्या इसमाची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल मिळाल्याचे सांगत आहेत. त्याचवेळी साक्षीदार क्र. ३ तपासी अंमलदार पोलिस उपनिरिक्षक सुनील सोनावले यांचा साक्षीपुरावा पाहता ते देखील आरोपीची त्यांनी दोन पंचासमक्ष अंगझडती घेतली, त्यामध्ये त्याच्याकडे १६,०००/— किंमतीचा पांढ—या रंगाचा सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन मिळुन आल्याचे सांगत आहेत.

११) अभियोग पक्ष पंचनामाम्यावरील पंचाना साक्षीकामी हजर ठेवू शकलेला नाही. अशापरिस्तितीत गुन्हातील जप्तीचा पंचनामा हा नक्की कोणी केला होता याबाबत शंका निर्माण करणारी होत असल्याने एकंदरीत जप्तीच्या पंचनाम्याबाबत शंका निर्माण होत आहे. तसेच साक्षीदार क्र. ३ तपासी अंमलदार यांनी त्यच्या सरतपासामध्येच प्रकरण हे सुमारे १० वर्षे जुने असल्याने ते आरोपीस पाहिल्यास ओळखू शकणार नाहीत असे कथन केलेले आहे. तसेच साक्षीदार क्र. २ ठाणे अंमलदार राजाराम पाटील यांनी देखील त्याच्या साक्षीपुराव्याच्या वेळी आरोपी न्यायालयात आहे किंवा नाही हे ते सांगू शकत नाहीत असे कथन करून ते आरोपीस ओळखू शकत नसल्याचे कबुल केलेले आहे. एकंदरीत सदरहू साक्षीपुराव्याचा विचार करता अभियोगपक्षाकडुन गुन्हातील मुद्देमाल हा आरोपीकडून जप्त करण्यात आलेला होता ही बाब संशयापलिकडे जाउन सिध्द नाही.

१२) प्रस्तुतच्या प्रकरणात आरोपीस पोलीसांनी लोहमार्ग स्थानकावर

संशयास्पदरित्या ताब्यात घेतलेले आहे. लोहमार्ग स्थानक हे वर्दळीचे ठिकाण असताना अभियोग पक्षाकडून आरोपीस लोहमार्ग स्थानकात संशयास्पदरित्या मुददेमाल ताब्यात असताना मिळून आला हयाबाबत प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासण्यात आलेला नाही. तसेच साक्षीदार क्र. १ पोलिस कर्मचारी राजू भोसले यांनी त्याच्या उलटतपासामध्ये प्रत्येक फलाटावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविलेले असल्याचे कबुल केलेले आहे. मात्र तपासी अंमलदार यांनी तपासादरम्यान प्रस्तुत गुन्हाच्या अनुंशंगाने आरोपी हा संशयास्पद रित्या रेल्वे फलाटावर मिळुन आला होता हयाबाबतचे सीसीटीव्ही देखील प्रकरणात दाखल केलेले नाहीत. त्यामुळे देखील आरोपी हा संशयीतरित्या लोहमार्ग स्थानकात मुददेमालासह मिळून आला होता ही बाब संशयापलीकडे जावून सिध्द होताना दिसून येत नाही. त्यामुळे सदरहु संशयाचा फायदा आरोपीला देणे क्रमप्राप्त ठरते. सबब, मी मुददा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी उत्तर देउन आरोपीला प्रस्तुत गुन्हयातुन सोडुन देणे न्यायोचित होईल असे माझे मत बनते. गुन्हयातील जप्त मुददेमालाबाबत आरोपीने दावा केलेला नाही, त्यामुळे गुन्हयातील जप्त मुददेमालाबाबत खालीलप्रमाणे आदेश करीत आहे. सबब, मुददा क्र.२ करीता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी **सचिन संतोष जाधव** हयास मुंबई पोलीस कायदा कलम १२४ च्या आरोपातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) प्रमाणे निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचा वैयक्तिक जातमुचलका व जामीन कद्बा यापुर्वीच रदद करण्यात येत आहे. |
| ३. | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे, या निर्णया विरूध्द अपील झाल्यास त्यातील उपस्थितीची हमी म्हणुन रक्कम रु. ५०,०००/– चा जामीन दयावा व तो आजपासुन सहा महिन्यापर्यंत वैध्य राहील. |
| ४. | प्रस्तुत प्रकरणातील जप्त मोबाईल फोनचा ताबा फिर्यादीला देण्यात यावा. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर केला)

VISHWAS PANDURANG SHINDE
Digitally signed by VISHWAS PANDURANG SHINDE
Date: 2026.05.08 17:12:05 +0530

(वि. पां. शिंदे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
लोहमार्ग न्यायालय, कल्याण

कल्याण
दिनांक : ०८/०५/२०२६